



# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १६० । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शुक्रवार ०३ /०७/२०२६ । पान - ६




# उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात संगमनेरात हजारोंचा एल्गार

## प्रांत कार्यालयावर भव्य मोर्चा, सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी






युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गाच्या उपवर्गीकरणाच्या प्रस्तावित निर्णयाविरोधात संगमनेर शहरात बुधवारी हजारो नागरिकांनी भव्य मोर्चा काढून राज्य सरकारच्या भूमिकेचा तीव्र निषेध केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून निघालेला हा मोर्चा शहरातील प्रमुख मार्गांवरून प्रांत कार्यालयावर धडकला. मोर्चामध्ये ग्रामीण भागासह शहरातील महार, बौद्ध तसेच अनुसूचित जाती प्रवर्गातील विविध समाजघटकांचे नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विशेष म्हणजे महिला व युवकांची उपस्थितीही लक्षणीय होती.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जाती प्रवर्गाचे उपवर्गीकरण करण्यासाठी बद्दर समितीची नियुक्ती केली होती. या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर राज्य सरकारने उपवर्गीकरणाची प्रक्रिया पुढे नेण्याचे संकेत दिले आहेत. मात्र या निर्णयाला अनुसूचित जाती प्रवर्गातील अनेक समाजघटकांकडून तीव्र विरोध होत असून, दुसरीकडे मातंग समाजाकडून उपवर्गीकरणाला पाठिंबा देत त्याची अंमलबजावणी करण्याची मागणी केली जात आहे. त्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गातच दोन भिन्न भूमिका समोर आल्याने सामाजिक व राजकीय वातावरण तापले आहे. मोर्चादरम्यान आंदोलकांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत उपवर्गीकरणाचा निर्णय तातडीने मागे घेण्याची मागणी केली. या निर्णयामुळे दलित समाजात कृत्रिम फूट निर्माण होत असून जाती-जातींमध्ये संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. काही वक्त्यांनी सरकारवर सामाजिक सलोखा बिघडविण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही केला.

आंदोलनकर्त्यांनी आपल्या भाषणांत सांगितले की, उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील लहान समाजघटकांवर अन्याय होईल. तसेच या निर्णयासाठी आग्रही असलेल्या समाजघटकांनाही प्रत्यक्षात अपेक्षित लाभ मिळणार नाही. सध्या सरकारी नोकऱ्याच उपलब्ध होत नाहीत, अनेक रिक्त पदे वर्षानुवर्षे भरली जात नाहीत. अशा परिस्थितीत समाजात फूट पाडण्याऐवजी रिक्त पदे भरणे, शिक्षण, रोजगार आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांवर सरकारने लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे मत आंदोलकांनी व्यक्त केले. यावेळी काही वक्त्यांनी मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर निर्माण झालेल्या सामाजिक संघर्षाचाही उल्लेख करत, आता अनुसूचित जाती प्रवर्गातही मतभेद निर्माण होत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली. समाजात तेढ निर्माण करणाऱ्या निर्णयांऐवजी सर्व घटकांना न्याय देणारे धोरण सरकारने स्वीकारावे, अशी मागणी करण्यात आली. मोर्चाच्या शेवटी प्रांताधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द करावा, सामाजिक ऐक्य अबाधित ठेवावे आणि अनुसूचित जाती प्रवर्गाच्या मूलभूत प्रश्नांवर सकारात्मक निर्णय घ्यावेत, अशी प्रमुख मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

मोर्चा शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. संपूर्ण मार्गावर पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## माझ्या वक्तव्याचा विपर्यास - खा. कोल्हे



पुणे (वृत्तसंस्था) पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्पाच्या संदर्भातील वक्तव्यावरून राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या जोरदार चर्चावर अखेर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी पडदा टाकला आहे. आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी आपल्या कालच्या ऑफर आली तर भविष्यात विचार करेन या विधानाचा चुकीचा अर्थ काढला गेल्याचे सांगत संपूर्ण प्रसंग स्पष्ट केला. शरद पवार साहेब सांगतील तेच आमचे धोरण आहे, असे सांगत त्यांनी आपण पक्षातच राहणार असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट केले.

पत्रकारांशी बोलताना अमोल कोल्हे म्हणाले, बऱ्याचदा असं होतं की एखादी न्यूज किंवा ब्रेकिंग न्यूज ही ठराविक टायटलमुळे चालते, पण त्यामागचा मूळ कॉन्टेक्स्ट सांगितला जात नाही. काल एका पत्रकार बांधवाने पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेच्या संदर्भात प्रश्न विचारला होता आणि त्यावरच मी सविस्तर भूमिका मांडली होती. रेल्वे प्रकल्पाचा इतिहास सांगताना कोल्हे म्हणाले, पुणे-नाशिक रेल्वेच्या पहिल्या अलाईमेंटच्या वेळी 'एमआरआयडीसी'ची स्थापना तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात झाली होती. त्यांनी या प्रकल्पाला खऱ्या अर्थाने गती दिली होती. त्यामुळेच मी त्यांचा 'इन्फ्रा मॅन' असा उल्लेख केला. संगमनेर, सिन्नर, नाशिक, जुन्नर, राजगुरुनगर येथील ग्रामस्थांची आणि नागरिकांची जी मागणी आहे, ती पूर्ण करण्यासाठी मी मुख्यमंत्र्यांना विनंती करत होतो. यात कोणताही राजकीय हेतू नव्हता. कोल्हे यांनी याच पार्श्वभूमीवर म्हटले होते की, ठाकरे गटाचे खासदार राजाभाऊ वाजे आणि मी (अमोल कोल्हे) पक्ष बदलला तरच हा प्रलंबित रेल्वे प्रकल्प पूर्ण होणार असेल तर ही योजना विकासासाठी आहे की लोकप्रतिनिधींवर दबाव आणून त्यांचे पक्षांतर करण्यासाठी आहे? याच दबावाच्या राजकारणावर खोचक टोमणा मारताना त्यांनी अशी कोणतीही ऑफर आलेली नाही, आली तर भविष्यात विचार करू असे म्हटले होते.

# भाजप नेते संदीप घुगे यांच्यावर जीवघेणा हल्ला

## घरावर गोळीबार, तलवारीने तोडफोड



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुका भाजपचे सरचिटणीस तथा मालुंजे गावचे माजी सरपंच संदीप घुगे यांच्यावर अज्ञात सहा जणांनी घराजवळ गोळीबार करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना बुधवार (दि. १ जुलै) रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास घडली. सुदैवाने या हल्ल्यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र आरोपींनी घरावर गोळीबार करत तलवारीने दरवाजे व खिडक्यांची तोडफोड केली आणि जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या.

घटनेची माहिती मिळताच पोलीस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे व पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. याप्रकरणी संदीप घुगे यांच्या फिर्यादीवरून विशाल हौशीराम खेमनर (रा. अंभोरे, ता. संगमनेर), प्रवीण ठकाजी पुणेकर (रा. डीग्रस, ता. संगमनेर), सुदर्शन शिवाजी श्रीराम व अन्य तीन जणांविरुद्ध खुनाच्या प्रयत्नासह विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास संगमनेर तालुका पोलीस करत आहेत.

फिर्यादीनुसार, गावातील एका शेतकऱ्याने आपल्या शेतातून अवैध मुरूम व मातीची वाहतूक होत असल्याची तक्रार संदीप घुगे यांच्याकडे केली होती. याबाबत त्यांनी विशाल खेमनर याला जाब विचारल्यानंतर त्याने फोन व व्हॉट्सपद्वारे वारंवार जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

बुधवारी रात्री जेवणानंतर संदीप घुगे हे घराजवळ फेरफटका मारत असताना दोन दुचाकींवरून सहा जण तेथे आले. त्यापैकी दोघांनी कमरेतील पिस्तूल काढून घुगे यांच्या दिशेने रोखले, तर अन्य आरोपी तलवार घेऊन त्यांच्या दिशेने धावले. प्रसंगावधान राखत घुगे यांनी घरात धाव घेत दरवाजा बंद केला. त्याचवेळी आरोपींनी दोन राऊंड गोळीबार केला. त्यातील एक गोळी दरवाजाला छेद देत घरात शिरली. दरवाजा उघडता न आल्याने आरोपींनी तलवारीने दरवाजा व खिडक्यांची तोडफोड केली. तसेच आज वाचलास, पण तुला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देत शिवीगाळ करून ते घटनास्थळावरून पसार झाले.


घटनेनंतर संदीप घुगे यांनी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून विशाल हौशीराम खेमनर, प्रवीण ठकाजी पुणेकर, सुदर्शन शिवाजी श्रीराम व अन्य तीन जणांविरुद्ध खुनाचा प्रयत्न, शस्त्रांचा वापर, घराची तोडफोड, धमकी आदी गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, याच आरोपींविरुद्ध यापूर्वीही धमकावल्याप्रकरणी तक्रार करण्यात आली होती.









# पारेगाव खुर्द पालखीमार्गाचे डांबरीकरण काम चार दिवसात पूर्ण

## आ. खताळ यांच्या सूचनेनंतर तातडीने कामाला सुरूवात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज यांच्या पालखी पायी दिंडी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पारेगाव बुद्रुक येथील अहिल्यानगर नाशिक जिल्हा सरहद्दी वरील पालखी मार्गाचे रखडलेले डांबरीकरण सार्वजनिक बांधकाम विभागाने अवघ्या चार दिवसांत पूर्ण केले आहे. त्यामुळे संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होणार्या लाखो वारकर्यांचा प्रवास अधिक सुरक्षित व सुखकर होणार आहे.

त्र्यंबकेश्वर येथून संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यापूर्वीच भाविकांना कोणताही अडथळा येऊ नये, म्हणून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार अमोल खताळ यांनी आठ दिवसांपूर्वी पालखी मार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून आढावा बैठक घेतली होती. त्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकार्‍यांना पालखी आगमनापूर्वी चार ते पाच दिवसांत उर्वरित रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते.या सूचनां नुसार पालखीमार्गाची दुरुस्ती आणि डांबरीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात आली. आणि अवघ्या चारच दिवसांत डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.

पालखी मार्गाच्या डांबरीकरणाचे काम वेळेत पूर्ण केल्याबद्दल पारेगाव बुद्रुकचे माजी उपसरपंच कैलास गोर्डे ,सामाजिक कार्यकर्ते सावित्रा गडाख रावसाहेब गडाख, बाबासाहेब गोर्डे , सुरेश दळवी, किशोर गडाख, सुनील गडाख बाळासाहेब गडाख, सुनील वाकचौरे,, भीमराज गडाख निलेश गडाख यांच्यासह ग्रामस्थ आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांनी आमदार अमोल खताळ यांचे विशेष आभार मानले.

# संगमनेरात अवैध धंद्यांचा सुळसुळाट

## पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष, प्रवीण कानवडे आक्रमक

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहर आणि तालुक्यामध्ये मागील काही दिवसांपासून अवैध धंद्यांनी पुन्हा एकदा डोके वर काढले असून, यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे. मटका, जुगार, गुटखा विक्री, अवैध कत्तलखाने आणि बेकायदेशीर दारू विक्री मोठ्या प्रमाणावर सुरू असूनही स्थानिक पोलीस प्रशासन याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करत असल्याचा खळबळजनक आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संगमनेर अध्यक्ष प्रवीण अरुण कानवडे यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी थेट अहिल्यानगरचे जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांना निवेदन देवून कारवाईची मागणी केली आहे.

पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात प्रवीण कानवडे यांनी संगमनेरमधील विदारक परिस्थितीवर बोट ठेवले आहे. तालुक्यात मटका आणि जुगार अड्डे राजरोसपणे सुरू आहेत. शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा काही टपऱ्यांवर आणि चालत्या-फिरत्या वाहनांद्वारे सर्रास विकला जात आहे. याशिवाय, अवैध कत्तलखाने आणि बेकायदेशीर दारूची विक्रीही मोठ्या प्रमाणात वाढली आहे.या अवैध व्यवसायांमुळे तालुक्यात गुन्हेगारी प्रवृत्ती फोफावली असून, याचा सर्वाधिक फटका सर्वसामान्य नागरिक, महिला आणि तरुण पिढीला बसत आहे. शांतताप्रिय संगमनेर शहरात यामुळे भीतीचे आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.



**संगमनेर परिसर हा सुसंस्कृत परिसर म्हणून ओळखला जातो. मात्र, मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या या दोन नंबरच्या धंद्यांमुळे सर्वसामान्यांचे जगणे कठीण झाले आहे. जिल्हा पोलीस प्रमुखांनी स्वतः या विषयात लक्ष घालून हे अवैध धंदे त्वरित आणि कायमचे बंद करावेत, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.**

**प्रवीण कानवडे**

**(शहर अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, संगमनेर)**

निवेदनात स्थानिक पोलिसांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. हे सर्व अवैध धंदे उघडपणे सुरू असतानाही संबंधित पोलीस प्रशासन यावर कोणतीही ठोस कारवाई करताना दिसून येत नाही, असा थेट आरोप कानवडे यांनी केला आहे. स्थानिक पातळीवर दाद मिळत नसल्याने अखेर जिल्हा पोलीस प्रमुखांना यामध्ये हस्तक्षेप करावा लागत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या निवेदनाद्वारे, संगमनेर शहर व तालुक्यातील सर्व जुगार अड्डे, मटका केंद्रे, गुटखा विक्रेते, अवैध कत्तलखाने आणि दारूचे गुत्ते यांवर आपल्या स्तरावरून विशेष पथके नेमून योग्य ती कायदेशीर कारवाई करावी आणि हे धंदे त्वरित बंद पाडून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी आग्रही मागणी प्रवीण कानवडे यांनी केली आहे. आता या निवेदनानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक संगमनेरमधील या अवैध साम्राज्याला कसा चाप लावतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आह





**मा. श्री. दत्ता कासार**

श्री क्षेत्र रामेश्वर देवस्थानचे कार्यकारी सचिव, स्वदेश उद्योग समूहाचे जनसंपर्क अधिकारी



**मा. श्री. अरूण ताजणे**

आशिर्वाद नागरी पतसंस्थेचे माजी चेअरमन

मो. ९४२२२२२२४१



**मा. श्री. मुजिब शेख**

शिवसेना (उबाठा) नेते

# जीएसटी संकलनात महाराष्ट्र नंबर वन- मुख्यमंत्री



मुंबई (वृत्तसंस्था)

देशात सर्वात जास्त वस्तू व सेवा कर संकलन करण्यामध्ये महाराष्ट्र हे देशामध्ये अव्वल आहे. वस्तू व सेवा कर संकलनाच्या मोबदल्यात केंद्र शासनाकडून सर्वाधिक लाभ मिळविणारे राज्यही महाराष्ट्र आहे. त्यामुळे जीएसटी व्यवस्थेमध्ये महाराष्ट्र ही देशाची राजधानी आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. तसेच देशामध्ये कर चोरी रोखण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित यंत्रणा उभारणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याचेही त्यांनी सांगितले.रवींद्र नाट्य मंदिर सभागृहात ९ व्या वस्तू व सेवा कर दिवस समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, महापौर रितू तावडे, केंद्रीय वस्तू व सेवा कर विभागाचे मुख्य आयुक्त प्राची स्वरूप, पुणे विभागाचे मुख्य आयुक्त नीरज कंसल, राज्य सेवा व वस्तू कर आयुक्त आशिष शर्मा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, वित्तीय सुधारणा अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी उपस्थित होते.'एक देश, एक कर आणि एक बाजार' अशी व्यवस्था निर्माण करणारा जीएसटी कर ही ऐतिहासिक सुधारणा असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जीएसटीमुळे भारत ही प्रामाणिकपणे अप्रत्यक्ष कर भरणाऱ्या करदात्यांची सोसायटी बनली आहे.

जीएसटी हा जगामध्ये सर्वात मोठ्या वित्तीय सुधारणांपैकी एक आहे. देशातील बरेच अप्रत्यक्ष कर एकत्र करून जीएसटी लागू करण्यात आला. देशामध्ये अनेक दिवस जीएसटीवर राज्यांची सहमती घेण्याचे कार्य सुरू होते. याबाबत केवळ चर्चाच सुरू होत्या. अनेक अप्रत्यक्ष करांचा भरणा, या करांची चोरी रोखण्यासाठी प्रशासन व व्यापारी दोन्ही दबावात असायचे. अशा परिस्थितीत देशामध्ये व्यापार आणि उद्योगांची वाढ होत नव्हती. मात्र प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वात जीएसटी लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला.

# टीईटी, नीट पेपर फुटी प्रकरणी एनएसयुआयचे प्रशासनाला निवेदन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - देशभरात झालेल्या नीट पेपर फुटी व राज्यभरात झालेल्या टीईटी पेपर फुटी मुळे शिक्षण क्षेत्राबाबत मोठा संभ्रम निर्माण झाला आहे .यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले आहे. आरोपींवर तातडीने कारवाई करावी या मागणीसाठी युवा नेत्या डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाध्यक्ष शेखर सोसे नेतृत्वाखाली एनएसयूआयच्या वतीने प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

प्रांताधिकारी कार्यालय येथे जिल्हा अध्यक्ष शेखर सोसे, आदित्य बर्गे,गौरव गुंजाळ, ओमकार शेटे, सुदर्शन शिंदे, सार्थक गुंजाळ ,प्रितम साबळे, सुदर्शन सानप ,दिपक शिंदे, आलोक बर्डे ,भूषण वाकचौरे, सार्थक सातपुते, हार्श रणखांबे ,सिद्धू बढे उपस्थीत होते.

या निवेदनात म्हटले आहे की, नीट आणि टीईटी सारख्या परीक्षांसाठी विद्यार्थी खूप परिश्रम करतात मात्र पेपर फुटी मुळे सर्वांचा भ्रमनिरास होतो. अनेक विद्यार्थी आत्महत्या करतात. वर्षभर कष्ट करताना त्यांचा प्रवास खर्च, राहण्याचा खर्च , जेवणाचा खर्च,फॉर्म फी, मानसिक तणाव या सगळ्या बाबींचा त्या विद्यार्थ्यांच्या जीवनावर परिणाम होतो इतके करूनही तो कष्ट करतो आणि अचानक पेपर फुटी मुळे त्याचा अपेक्षाभंग होतो यामध्ये अनेक दलाल पैसे कमवत असून यामुळे शिक्षण क्षेत्र हे भ्रष्टाचाराचे कुरण बनले आहे.

त्यामुळे शासनाने भविष्यात पेपर फुटी थांबवण्यासाठी प्रभावी उपाययोजना करावी अधिक पारदर्शकता राबवावी व या प्रकरणी उच्चस्तरीय निपक्षपणे चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच फेर परीक्षेचे वेळापत्रक तातडीने जाहीर करावी अशी मागणी करण्यात आली. याप्रसंगी एन एस यु आय व युवक काँग्रेसचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

# खंडू सोन्याबापु बाळसराफ यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले येथील ज्येष्ठ नागरिक कै. खंडू सोन्याबापु बाळसराफ यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून बाळसराफ परिवारावर शोककळा पसरली आहे. कै. बाळसराफ हे शांत, मनमिळावू आणि समाजात आदराचे स्थान असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. त्यांच्या स्वभावामुळे त्यांनी अनेकांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण केले होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन नातू, एक भाऊ, सून तसेच अन्य नातेवाईक असा परिवार आहे.

त्यांच्या निधनाची बातमी समजताच नातेवाईक, मित्रपरिवार व परिचितांनी दुःख व्यक्त केले असून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली जात आहे. कै. खंडू सोन्याबापु बाळसराफ यांच्यावर अकोले येथील सिद्धेश्वर मंदिर परिसरात अंत्यसंस्कार करण्यात आले. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# महिलांच्या श्रमाला मिळणार कायद्याचे कवच

## सादर झाले महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक

राज्यातील शेती आणि अनुषंगिक क्षेत्रात रात्रंदिवस राबणाऱ्या, परंतु जमिनीहिश्श्यावर स्वतःचे नाव नसल्यामुळे शासकीय लाभांपासून वंचित राहणाऱ्या लाखो महिलांच्या श्रमाला आता कायद्याचे कवच लाभणार आहे. प्रत्यक्ष शेतीची मालकी नसली तरी कृषी क्षेत्रात योगदान देणाऱ्या महिलांना बँक कर्ज, पीक विमा आणि विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणारे ऐतिहासिक 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६' बुधवारी विधानसभेत सादर करण्यात आले. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी हे विधेयक सभागृहासमोर मांडले असून, या कायद्यामुळे राज्यातील महिलांना 'शेतकरी' म्हणून हक्काची कायदेशीर ओळख मिळणार आहे. कृषी धोरणे, योजना आणि विस्तार प्रणाली लिंगभाव निरपेक्ष असली, तरीही शेतजमिनीच्या मालकीची तांत्रिक अट आड येत असल्याने आतापर्यंत काही टक्केच महिलांना सरकारी योजनांचा लाभ घेता येत होता.




जमिनीचे औपचारिक मालकीहक्क नसल्यामुळे कौटुंबिक किंवा सामुदायिक जमिनीवर शेती करणाऱ्या महिलांची गणना 'शेतमजूर' म्हणून केली जात होती. हीच दरी मिटवून महिला शेतकऱ्यांना सन्मान मिळवून देण्यासाठी आणि त्यांना योजना, पतकर्ज व बाजारपेठ मिळविण्यातील उपेक्षेला कायमचा पायबंद घालण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. या प्रस्तावित कायद्यांतर्गत महिला शेतकऱ्यांना आपली ओळख सिद्ध करण्यासाठी 'महिला शेतकरी प्रमाणपत्र' देण्यात येणार आहे. हे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी संबंधित महिलेला ग्रामपंचायतीकडे विहित नमुन्यात अर्ज करावा लागेल. त्यानंतर संबंधित अर्ज मंजुरीसाठी ग्रामसभेसमोर ठेवला जाईल. महिला शेती अथवा त्याच्याशी संबंधित व्यवसायात कार्यरत आहे की नाही, याची खातरजमा करून ग्रामसभा या अर्जाला मंजुरी देईल. जर ग्रामसभेने एखाद्या महिलेचा अर्ज नाकारला, तर त्याची ठोस आणि कायदेशीर कारणे लेखी स्वरूपात देणे बंधनकारक करण्यात आले आहे.विशेष म्हणजे, ग्रामीण भागातील ज्या महिलांनी स्वतःहून अर्ज केला नसेल, परंतु त्या शेती आणि अनुषंगिक कामे करत असल्याचे स्पष्ट असेल, तर त्यांनाही स्वाधिकारे प्रमाणपत्र देण्याचा विशेष अधिकार ग्रामसभेला देण्यात आला आहे. निमशहरी किंवा नगरपंचायत क्षेत्रातील महिलांनी केलेल्या अर्जांवर नगरपंचायतीच्या सर्वसाधारण सभेत निर्णय घेतला जाईल. हे ठराव मंजूर झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत संबंधित पदनिर्देशित अधिकाऱ्याने महिला शेतकरी प्रमाणपत्र देणे बंधनकारक असेल.

जर एखाद्या महिलेचा अर्ज नाकारला गेला, तर तिला १२० दिवसांच्या आत अपील अधिकाऱ्याकडे दाद मागण्याची तरतूदही कायद्यात करण्यात आली आहे.या विधेयकाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यात 'शेती' आणि 'शेतकरी' या शब्दांची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आली आहे. आतापर्यंत पारंपरिक पिकांची लागवड करणाऱ्यांनाच शेतकरी मानले जात होते. मात्र, प्रस्तावित कायद्यानुसार मासेमारी, जलीय संवर्धन, रेशीम उत्पादन, गांडूळ खत निर्मिती, फलोत्पादन, कुक्कुटपालन, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय आणि मालकी हक्क नसतानाही गौण वन उत्पादने गोळा करणे, अशा बिगरलागवड व संलग्न क्षेत्रात सहभागी असलेल्या महिलांनाही 'शेतकरी महिला' म्हणून अधिकृत मान्यता दिली जाणार आहे. तसेच परित्यक्ता, विधवा आणि घटस्फोटित एकल महिला शेतकऱ्यांसाठी विशेष साहाय्य कार्यक्रम राबवले जातील.त्याशिवाय महिला शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विशेष यंत्रणा उभारली जाणार आहे. या महिलांना बँकांकडून सुलभतेने पतकर्ज मिळवून देणे, पीक विमा छताखाली आणणे, कृषी अनुदाने थेट बँक खात्यात जमा करणे, आधुनिक शेतीचे प्रशिक्षण देणे, लिंगभाव-प्रतिसादक्षम कृषी तंत्रज्ञान व यांत्रिकीकरणाची उपलब्धता करून देणे आणि उत्पादित मालाला हक्काची बाजारपेठ मिळवून देणे या बाबी कायद्याच्या अंमलबजावणीत समाविष्ट आहेत. याशिवाय, महिला शेतकऱ्यांच्या दैनंदिन समस्यांचे वेळेत निराकरण करण्यासाठी स्वतंत्र मदत केंद्रे (इम्पॉव्हर्मेंट सेल) आणि तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे.या प्रस्तावित कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि विविध विभागांमध्ये समन्वय राखण्यासाठी राज्य स्तरावर शक्तिशाली समित्या स्थापन केल्या जातील. त्यात महिला शेतकरी सक्षमीकरण परिषदेचा समावेश आहे. मुख्यमंत्री या परिषदेचे अध्यक्ष असतील.

# सह्याद्री ॲग्रोव्हेट टीम तर्फे जि. प. प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनींना शालेय बॅग वितरण



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - रसामाजिक बांधिलकी जपत आणि शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सह्याद्री ॲग्रोव्हेट टीम तर्फे महाराष्ट्रभरातील १०० हून अधिक जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील विद्यार्थिनींसाठी शालेय बॅग वितरणाचा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत राज्यातील विविध भागांतील ५,००० हून अधिक विद्यार्थिनींना नवीन शैक्षणिक वर्षाच्या निमित्ताने शालेय बॅगचे वितरण करण्यात आले.

विद्यार्थिनींना शिक्षणासाठी आवश्यक साहित्याची मदत मिळावी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवरील शैक्षणिक खर्चाचा काही प्रमाणात भार कमी व्हावा आणि प्रत्येक विद्यार्थिनीने आत्मविश्वासाने शिक्षणाची वाटचाल करावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये शिक्षणाविषयी उत्साह निर्माण झाला असून नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंददायी वातावरणात झाली.

सह्याद्री ॲग्रोव्हेट टीम ही केवळ शिक्षण क्षेत्रापुरती मर्यादित नसून सामाजिक उत्तरदायित्व जपत विविध लोकहिताचे उपक्रम सातत्याने राबवत आहे. शेतकरी आणि गोपालकांच्या हितासाठी नवजात वासरांच्या संगोपनासाठी वासराला दूध पाजण्याची मोफत बॉटल वाढणं योजना, सुकन्या योजना, गोपालक सन्मान सोहळा, तसेच गायीचा मृत्यू झाल्यास गोमुक्ती योजनेअंतर्गत १,००० रु. ची आर्थिक मदत असे अनेक सामाजिक उपक्रमही राबविले जात आहेत. समाजातील विविध घटकांना आधार देण्याचा आणि ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देण्याचा सह्याद्री ग्रोव्हेट टीमचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे.

या सामाजिक उपक्रमाचे शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, ग्रामस्थ तसेच स्थानिक नागरिकांनी मनापासून स्वागत केले. सह्याद्री ॲग्रोव्हेट टीमच्या समाजहिताच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले. भविष्यातही शिक्षण, शेतकरी कल्याण आणि सामाजिक विकासासाठी अशाच विविध उपक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प सह्याद्री ॲग्रोव्हेट टीमने व्यक्त केला. या उपक्रमाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतूक होत आहे.

संगमनेरकरांनी गौरविलेले
||जय श्रीराम||
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# अकोले मेडिकल फाउंडेशनतर्फे डॉक्टरांचा गौरव



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- अकोले मेडिकल फाउंडेशनच्यावतीने राष्ट्रीय डॉक्टर्स डे निमित्त अकोले तालुक्यातील डॉक्टरांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. तसेच केक कापून राष्ट्रीय डॉक्टर्स डे उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास डॉ. तुषार राहणे, डॉ. महेश कदम, डॉ. वृषाली रहाणे, डॉ. तुषार गावडे, डॉ. अद्वैत देशपांडे, डॉ. रवी गोर्डे आदी डॉक्टर उपस्थित होते. तसेच डॉ. एम. के. भांडकोळी, डॉ. दर्शन बंगाळ, डॉ. बाळासाहेब मेहेत्रे (वैद्यकीय अधीक्षक), डॉ. हर्षदा बंगाळ, डॉ. कल्याणी आरोटे, डॉ. रेणुका देशपांडे, डॉ. मच्छिंद्र मंडलिक, डॉ. संदेश भांगरे, डॉ. शिवाजी वैद्य, डॉ. प्रतिक घोडके, डॉ. नीरजा कुलकर्णी आणि डॉ. प्रकाश वाकचौरे यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी ग्रामीण भागात वैद्यकीय सेवा देताना डॉक्टरांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, मात्र अत्यल्प साधनसामग्रीतही रुग्णांना दर्जेदार उपचार देऊन त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलवणे, हाच डॉक्टरांसाठी सर्वात मोठा पुरस्कार असल्याचे मत व्यक्त केले. डॉक्टर देव नसले तरी ते देवापेक्षा निश्चितच कमी नाहीत अशी भावनाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

डॉक्टरांच्या सेवाभाव, संवेदनशीलता आणि समाजाप्रती असलेल्या समर्पणाचा गौरव करण्याच्या उद्देशाने सौ. रूपाली वाकचौरे यांच्या संकल्पनेतून तालुक्यातील डॉक्टरांना गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. या उपक्रमामुळे समाजातील डॉक्टरांविषयीचा आदर अधिक दृढ झाला असून त्यांच्या निःस्वार्थ सेवेला कृतज्ञतेची मानवंदना देण्यात आली. यावेळी अकोले हॉस्पिटलच्या परिचारिका, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी तसेच संपूर्ण मेडिकल स्टाफ यांनीही डॉक्टरांचा गुलाबपुष्प देऊन सन्मान केला. रुग्णसेवेत डॉक्टरांसोबत खांद्याला खांदा लावून कार्य करणाऱ्या सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांनी डॉक्टरांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. या प्रसंगी डॉक्टरांनीही सर्व स्टाफच्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार मानले आणि उत्कृष्ट आरोग्यसेवा ही डॉक्टर व संपूर्ण आरोग्य पथकाच्या सामूहिक प्रयत्नातूनच शक्य होत असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाचे आयोजन अकोले मेडिकल फाउंडेशनच्यावतीने करण्यात आले असून उपस्थित डॉक्टरांनी या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे कौतुक केले.

# रेल्वे प्रश्नावर आत्मपरीक्षण करा - पायल ताजणे



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

सर्व सतास्थाने असताना सुध्दा मागच्या पंचेचाळीस वर्षात संगमनेला रेल्वे प्रकल्प का येवू शकला नाही आणि आघाडी सरकारच्या काळात मार्ग बदलण्याचे काम कोणी केले याचे आत्मपरीक्षण डॉ. जयश्री थोरात यांनी करावे अशी प्रतिक्रिया भाजपाच्या शहर अध्यक्षा पायल ताजणे यांनी दिली.

नासिक- पुणे रेल्वे प्रश्नाबाबत डॉ. जयश्री थोरात यांनी व्यक्त केलेल्या वक्तव्यावर बोलताना सौ. पायल ताजणे म्हणाल्या की, रेल्वेचा प्रश्न एकमेकांकडे बोट दाखवून सुटणारा नाही. यामध्ये सर्वपक्षीय एकजुटीची गरज आहे. परंतू डॉ. जयश्री थोरात यांनी राजकीय भावनेतून केलेले वक्तव्य म्हणजे केवळ प्रसिध्दी मिळविण्याचा स्टंट आहे. वास्तविक नासिक - पुणे रेल्वेच्या संदर्भात जिल्ह्याचे पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पहील्यापासून प्रस्तावित मार्ग संगमनेर अकोले तालुक्यातून गेला पाहीजे ही भुमिका मांडून त्याचा पाठपुरावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांच्याकडे केला.

विधीमंडळाचे अधिवेशन सुरू असताना सर्व पक्षीय राजकारण बाजूला ठेवून मंत्री विखे पाटील यांनी सर्व लोकप्रतिनिधीची बैठक घेवून प्रस्तावित मार्ग पहील्या आराखड्यानूसार कायम ठेवण्याची भूमिका घेतली आहे. मात्र प्रत्येक प्रश्नाकडे राजकीय नजरेतून पाहाण्याची सवय लागल्याने कोणताही मुद्दा समजून न घेता डॉ. जयश्री थोरात यांनी रेल्वे शिर्डीला पळविल्याचा केलेला आरोप अतिशय हास्यास्पद आणि केविलवाणा आहे. भारतीय जनता पक्षाने या विषयाचे राजकारण होवू न देता या प्रश्नाबाबतच्या कुणावर टिका टिपणी केली नाही. परंतू शिर्डीकडे बोट दाखवून तुम्ही एकप्रकारे तुमचे अपयश कबूल करीत आहात. प्रस्तावित मार्ग राज्यात महाविकास आघाडी सरकारच्या काळात बदलला गेला याची माहीती आधी डॉ. जयश्री थोरात यांनी करून घ्यावी मगच दुसऱ्याकडे बोट दाखवण्याचा सल्ला सौ. पायल आशिष ताजणे यांनी दिला आहे.

# डॉक्टर दिनानिमित्त मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक डायलिसिस मशीनचे उद्घाटन




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- डॉक्टर दिनाचे औचित्य साधत मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर येथे अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नवीन डायलिसिस मशीनचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या सुविधेमुळे मूत्रपिंड विकारांवरील उपचार अधिक प्रभावी, सुरक्षित व दर्जेदार पद्धतीने उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दरमहा सुमारे ८०० ते १००० डायलिसिस करण्यात येतात. रुग्णांच्या सेवेसाठी येथे २४ तास डायलिसिस सुविधा उपलब्ध असून, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा देण्यावर हॉस्पिटलचा भर असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या उद्घाटन प्रसंगी नेफ्रोलॉजिस्ट डॉ. सागर हासे, नेफ्रोलॉजिस्ट डॉ. काजल दरंदले तसेच मेडिकव्हर हॉस्पिटलच्या केंद्र प्रमुख डॉ. स्नेहल गायके उपस्थित होत्या. तसेच डायलिसिस विभागाचे इन्चार्ज शुभम केरे यांच्यासह संपूर्ण डायलिसिस टीम आणि हॉस्पिटलचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. संगमनेर व परिसरातील रुग्णांना जागतिक दर्जाच्या आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मेडिकव्हर हॉस्पिटल सातत्याने प्रयत्नशील असून, भविष्यातही अशाच अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

# शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन आत्मनिर्भर व्हा - कोरगंटीवार

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- तृतीयपंथी व्यक्तींच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी शासनामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत असून, पात्र लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घेऊन आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करावी, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे समाज कल्याण विभागामार्फत तृतीयपंथी व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित जिल्हास्तरीय विशेष कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त योगेश उगले, लैला गुरु नगरवाले, दिशा पिंकी शेख, किरण नेटके, चंद्रकांत काळोखे, ड. अनुराधा येवले, डॉ. विक्रम पानसंबळ, शिवाजी जाधव, दिलावर शेख तसेच मोठ्या संख्येने तृतीयपंथी व्यक्ती उपस्थित होत्या.

सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार म्हणाले की, तृतीयपंथी व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. समाज कल्याण विभागामार्फत आर्थिक, शैक्षणिक, स्वयंरोजगार आणि सामाजिक सुरक्षा योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. पात्र लाभार्थ्यांनी पुढाकार घेऊन 'बीज भांडवल योजनेसह' शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा. शासनाचे सर्व विभाग समन्वयाने कार्यरत असून, या योजनांचा लाभ प्रत्येक पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासन सातत्याने प्रयत्नशील आहे. कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त योगेश उगले यांनी रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रमांची माहिती दिली. ड. अनुराधा येवले यांनी तृतीयपंथी व्यक्तींच्या घटनात्मक व कायदेशीर हक्कांविषयी मार्गदर्शन केले. तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत उपलब्ध मोफत कायदेशीर सहाय्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

दिशा पिंकी शेख यांनी आधार कार्ड, रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र, तृतीयपंथी प्रमाणपत्र आणि ओळखपत्रश यांसारखी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध असण्याचे महत्त्व स्पष्ट केले. वरिष्ठ वैद्यकीश अधिकारी डॉ. विक् पानसंबळ यांनी आरोग्य, मानसिक आरोग्य आणि व्यसनमुक्तीविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात व्यसनमुक्तीची शपथ घेऊन करण्यात आली. यावेळी दिवंगत काजल गुरु नगरवाले यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यशाळेत तृतीयपंथी व्यक्तींसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. तसेच संजय गांधी निराधार अनुदान योजना, आयुष्मान भारत योजना आणि बीज भांडवल योजना यांसाठी अर्ज भरण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली. यावेळी जिल्हास्तरीय तृतीयपंथी तक्रार निवारण समितीच्या कामकाजाची माहिती देण्यात आली. कोणत्याही अडचणी अथवा तक्रारींसाठी ०२४१-२३२९३७८ या साहाय्य दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

# भंडारदरा परिसरात भात रोपे तरतरली



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर- उशिरा का होईना जून महिना अखेरीस काहीसा पावसाने दिलासा दिल्यामुळे हरिश्चंद्रगड व कळसुबाई शिखराच्या पायथ्याशी असलेल्या भागात सततधार पाऊस पडत असल्यामुळे भातशेतीचे रोपे चांगले बहरायला सुरुवात झाली असल्याने शेतकरी राजादेखील सुखावला आहे. त्यामुळे लवकरच भात लावणीची (आवणी) कामे देखील सुरू होतील असा विश्वास आदिवासी भागातील शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. मुळा- प्रवरा पाणलोट क्षेत्रात जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पावसाने हजेरी लावली, मात्र सामाधान कारक पाऊस पडत नव्हता. त्यामुळे अनेकांच्या पेरण्या बाकी होत्या. अखेर जूनच्या शेवट व जुलैच्या पहिल्या आठवड्यात पावसाचे आगमन होवून वातारणात गारवा निर्माण झाला आणि सगळीकडे हिरवळ पसरु लागली. तर सद्यस्थितीला भातरोपाची मोठ्या प्रमाणात वाढ होऊ लागली आहे.

पावसाची रिमझिम असल्याने शेतकरी राजा सुखावला आहे. आदिवासी भागातील भात शेती चांगलीच बहरण्यास सुरुवात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. तर सुरू असलेली पावसाची संततधार अशीच कायम सुरू राहिली तर भात लावणीच्या कामाला देखील सुरुवात होईल आणि लावणी देखील वेळेत संपेल, अशी आशा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. अधून-मधून संततधार पडणाऱ्या पावसामुळे पाचनई, कुमशेत, आंबित, शिरपुंजे, रतनवाडी, भंडारदरा, घाटघर हा सगळा परिसर हिरवागार झाला आहे. सद्य भंडारदरा धरणात २४९० दलघफू पाणी साठा आहे.

# जिजामाता स्कूलमध्ये विद्यार्थी परिषद कौन्सिलचा शपथविधी उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- जिजामाता स्कूलमध्ये विद्यार्थी परिषद शपथविधी सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमासाठी संगमनेर नगरपरिषदेच्या अध्यक्षा डॉ. मैथिलीताई तांबे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी मैथिलीताईंच्या यांच्या हस्ते नवनियुक्त विद्यार्थी प्रतिनिधींचा पदग्रहण व शपथविधी सोहळा पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य सौ. जिज्ञासा कुलकर्णी यांनी स्वागत करुन झाली. त्यानंतर प्रमुख पाहुणे व विद्यार्थी परिषद सदस्यांची ओळख करून देण्यात आली व त्यांना शाळेप्रती निष्ठा, जबाबदारी आणि नेतृत्वभावना जपत कार्य करण्याची शपथ देण्यात आली. यावर्षी विद्यार्थी परिषदेमध्ये हेड बॉय - उत्कर्ष गुंजाळ, हेड गर्ल - अमूल्या कोल्हे, असिस्टंट हेड बॉय - श्रेयस कापडी, असिस्टंट हेड गर्ल - वेदश्री कडलग, अकॅडेमीक हेड - ऋग्वेद अंदुरे, डिसिप्लिन हेड - यज्ञेश आभाळे, कल्चरल हेड - सिद्धी वडजे, स्पोर्ट्स हेड - सेजल अष्टेकर, हिमालय हाऊस कॅप्टन- प्रतिक भुसाळ, असिस्टंट कॅप्टन- ऋतुजा बिरादार, सह्याद्री हाऊस कॅप्टन - समृद्धी कानवडे, असिस्टंट कॅप्टन - दर्शन कर्डिले, सातपुडा हाऊस कॅप्टन -सिंधा चौधरी, असिस्टंट कॅप्टन- साईराज पावबाके, विंध्य हाऊस कॅप्टन- सोहम गवांदे, असिस्टंट कॅप्टन- स्वरा कोल्हे यांची निवड करण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुण्या मैथिलीताई तांबे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, नेतृत्व म्हणजे जबाबदारी स्वीकारून सर्वांना सोबत घेऊन पुढे जाणे. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या नेत्याला सहकार्य करून शाळेच्या प्रगतीसाठी योगदान दिले पाहिजे. त्यांनी विद्यार्थ्यांना नेतृत्वगुण, शिस्त, सहकार्य आणि सामाजिक जाणीव यांचे महत्त्वही पटवून दिले.

कार्यक्रमासाठी शाळेचे सचिव प्रा. विठ्ठलराव शेवाळे उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांनी नवनियुक्त परिषद सदस्यांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोहम जाधव व ईश्वरी पावबाके या विद्यार्थ्यांनी केले तर आभार प्रदर्शन उपप्राचार्या माधुरी शेवाळे यांनी केले. उत्साह, जबाबदारी आणि प्रेरणादायी वातावरणात हा शपथविधी सोहळा संपन्न झाला.

# यशदीप दिघे यांची लेफ्टनंटपदी निवड अभिमानास्पद - माजी मंत्री थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शेतकरी कुटुंबातून पुढे आलेल्या यशदीप दिघे यांने वडिलांकडून भारतीय सैन्य दलाच्या सेवेचा वारसा घेतला. संघर्ष परिश्रम आणि ध्येय ठेवून त्याने मिळवलेले यश हे तरुणांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे. यशदीप दिघे यांची एनडीए मधून लेफ्टनंटपदी झालेली निवड ही सर्वांसाठी अभिमानास्पद असल्याचे प्रतिपादन काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

जोर्वे येथे ग्रामस्थांच्या वतीने यशदीप राजेंद्र दिघे यांची लेफ्टनंटपदी निवड झाल्याबद्दल नागरी सत्कार करण्यात आला यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी मा. आ.डॉ.सुधीर तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, रावसाहेब दिघे, मेजर राजेंद्र दिघे, अर्जुन दिघे, सर्जेराव दिघे, सुरेश थोरात, विठ्ठल काकड, बादशहा बोरकर, संजय थोरात, रमेश थोरात, अनिल थोरात, पी. वाय. दिघे, सौ. मुक्ता दिघे, प्रांजल दिघे, नामदेव कहांडळ, नानासाहेब दिघे आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते.

यशदीप दिघे हा जोर्वे येथील रहिवासी असून वडील राजेंद्र दिघे हे भारतीय सैन्यदलात नोकरीत होते. पुणे येथे ३ वर्ष एनडीएचे प्रशिक्षण घेऊन देहराडून येथे एक वर्षाचे प्रशिक्षण त्यांनी घेतले आहे. आता त्यांची निवड काश्मीर मधील लडाख येथे लेफ्टनंटपदी झाली आहे.

यावेळी बोलताना माजीमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, आजोबा रावसाहेब दिघे यांनी अत्यंत प्रामाणिकपणे कष्ट केले. शेतीमध्ये कष्ट करून हा परिवार फुलवला. मुलांना संस्कार दिले. राजेंद्र दिघे यांनी देशाच्या सीमेवर विविध ठिकाणी सेवा दिली. ती प्रेरणा घेऊन मुलगा यशदीप याने एनडीए मधून मोठे यश मिळवले आहे. आपल्या मुलांना संधी मिळाली की ते त्याचं सोनं करतात हे वैशिष्ट्य आहे. तालुक्यातील अनेक मुलं विविध ठिकाणी मोठ मोठ्या पदांवर काम करत आहे. आणि हा आपल्या सर्वांचा अभिमान आहे. मुलांनी शिक्षण घेऊन वेगवेगळ्या क्षेत्रात पुढे जावे. कुटुंबाचं आणि तालुक्याचे नाव मोठे करावे असे सांगताना यश परिश्रम आणि सातत्य जर ठेवले तरी तुम्हाला मोठे नाव मिळेल. यशदीप दिघे यांची देश सेवेसाठीची ही वाटचाल नवीन विद्यार्थ्यांना नक्कीच प्रेरणादायी असल्याचे ते म्हणाले. तर मा. आ. डॉ. तांबे म्हणाले की, एनडीए साठी निवड होणे हे अवघड बाब आहे. याकरता तरुणांना अभ्यास परिश्रम आणि सातत्य महत्त्वाचा आहे. भारतीय सैन्य दलात लेफ्टनंट पदी निवड होणे हे सर्वांसाठी गर्वाची बाब आहे. तर डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, तरुणांना वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये मोठी संधी आहे. मात्र त्यासाठी सातत्याने परिश्रम करण्याची तयारी पाहिजे. रील च्या बाहेर येऊन रियल लाईफ यशस्वी होण्यासाठी काम करा. सैन्यदलाचा गणवेश हा युवकांसाठी स्फूर्तीदायी ठरणारा असल्याचे त्या म्हणाल्या.

तर लेफ्टनंट यशदीप दिघे म्हणाले की, लहानपणापासूनच सैन्य दलात मोठ्या पदावर जाण्याची माझी इच्छा होती. ध्येय ठेवून मी सातत्याने अभ्यास केला. यामध्ये आई - वडील आणि कुटुंबाचा पाठिंबा मिळाला. अभ्यास आणि मैदानी खेळ यावर मी भर दिला. रील मोबाईल यापासून कायम दूर राहिलो. लडाख मधील पहिली पोस्टिंग ही माझ्यासाठी मोठी अनुभव देणारी ठरणार आहे.

## संपादकीय...

### जागतिक प्लास्टिक पिशवी मुक्त दिन

# कापडी वा कागदी पिशव्या वापरा ना ....

प्लास्टिकमुळे पर्यावरणाची हानी होते, हे आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत आणि प्लास्टिकच्या पिशव्या, बाटल्या, चमचे, ग्लास आणि प्लेट्स वापरून फेकून दिल्यावर ती वर्षानुवर्षे पृथ्वीच्या पृष्ठभागावर किंवा नदी आणि समुद्रात साचत राहतात. जमिनीच्या पोटात पाण्याचा निचरा नीट होत नाही, त्यामुळे भारतात सिंगल यूज प्लास्टिकवर बंदी आहे. तरीही प्लास्टिकचा वापर अनेक प्रकारांत होतो. प्लास्टिकमुळे होणाऱ्या समस्यांवर प्रकाश टाकण्यासाठी आणि लोकांना किमान त्याचा वापर करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी दरवर्षी ३ जुलै रोजी आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिवस साजरा केला जातो. सन २००९ मध्ये हा दिवस पहिल्यांदा साजरा करण्यास सुरुवात झाली.

आपण आपल्या पातळीवर प्लास्टिकचा वापर कमी करून किंवा न करून पर्यावरण रक्षणासाठी हातभार लावू शकतो. प्लास्टिकच्या पिशव्यांऐवजी आम्ही कागदी किंवा कापडी पिशव्या वापरू शकतो. कागदाची पिशवी तयार करण्यासाठी कोणताही तपकिरी किंवा पांढरा जाड कागद घ्या. त्यावर सरळ रेषा काढा आणि फोल्ड करा. जेव्हा पिशवीचा आकार पूर्णपणे येतो तेव्हा शेवटी एक छिद्र करा आणि एक दोरी किंवा धागा बांधा. आमची बॅग तयार आहे. सन २००९साली पश्चिम युरोपमध्ये प्लास्टिक पिशवी वापरावर बंदी लावायला सुरु केले. यानंतर सन २०१३ या वर्षी बॅग्स फ्री वर्ल्ड ऑर्गनायझेशन या संस्थेने आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन साजरा करायला सुरुवात केली आणि हा दिवस जगभरात लोकप्रिय होत गेला. सन २०१५मध्ये युरोपियन युनियनने सिंगल यूज प्लास्टिकवर बंदी घालण्यासाठी पहिले पाऊल उचलले. सन २०२२मध्ये सिंगल यूज प्लास्टिकच्या वापरावर बंदी आणणारा बांगलादेश पहिला देश बनला. भारतामध्येही सिंगल यूज प्लास्टिक पिशवीवर बंदी आहे. प्लास्टिकमुळे होणारे प्रदुषण रोखण्यासाठी त्याचा कमीत कमी वापर करणे, खूप महत्वाचे आहे. आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिन या दिवशी प्लास्टिकबद्दल जागरुकता पसरवण्यासाठी जगभरात संदेश दिले जातात. प्लास्टिकऐवजी दुसऱ्या पर्यायांच्या वापराबद्दल प्रेरित केले जावे, म्हणून आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिवस साजरा केला जातो. प्लॅस्टिक पिशव्या सहसा बॉक्स, कार्टन किंवा जार यांच्या तुलनेत कमी सामग्री वापरतात, त्यामुळे त्यांना कमी असलेले किंवा कमी केलेले पॅकेजिंग मानले जाते. आज आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिवस आहे. हा दिवस प्लास्टिकसंदर्भात लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी जाहीर करण्यात आला होता. परंतु आज वाढत्या प्रदूषणाबद्दल आपण किती जागरूक आहोत हा प्रश्न कायम उभा ठाकला आहे. आज देशातील अनेक शहरे प्लास्टिकच्या विळख्यात अडकली आहेत. प्लास्टिक हे पर्यावरणासाठी घातक असून, आपण मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा वापर करत आहोत. प्लास्टिकच्या पिशव्यांचा अनावश्यक वापर करून मानवी आरोग्याशी खेळले जात आहे. प्लास्टिकमुळे होणारे नुकसान, त्याचा वाढता वापर आणि दुष्परिणामांविषयी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय प्लॅस्टिक बॅग फ्री डे ३ जुलै २००९ पासून संपूर्ण जगात साजरा करण्यात येत आहे. आजही मोठ्या बाजारांपासून ते भाजी मार्केटपर्यंत वस्तू प्लास्टिकमध्ये उघडपणे विकल्या जात आहेत. दिवसेंदिवस समुद्रात वाढत्या प्लास्टिक प्रदूषणामुळे समुद्री प्राण्यांच्या जीवालाही धोका निर्माण झाला आहे.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सन २०२२पर्यंत देशाला सिंगल युज प्लास्टिक मुक्त करण्याची घोषणा केली होती. सध्या संपूर्ण देशात सिंगल युज प्लास्टिकच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. मात्र, त्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यास अडचणी येत आहेत. प्लास्टिक पिशव्यांवर घातलेल्या बंदीनंतर प्लास्टिकची अवैध वाहतूक आणि काळा बाजार या सारखे प्रकार समोर आले आहेत. प्लास्टिकची पिशवी मागू नका! अशी पाटी लिहिलेल्या दुकानातही दुकानदार पिशव्या ठेवतात. तर ग्राहकही त्यांच्याकडे पिशव्या मागतात. त्यामुळे प्लास्टिकचा वापर न करण्याची सुरुवात प्रत्येकाने स्वत:पासून सुरू करायला हवी. घराबाहेर पडताना पिशवी घेऊनच बाहेर पडावे. प्लास्टिकची पिशवी मागू नका. प्लास्टिक पिशवी दिली तरी तीला नाही म्हणाच! तरच प्लास्टिकचा वापर कमी होऊ शकेल आणि निसर्गाचे जतनही होऊ शकेल, असे अपेक्षा करुया!

# आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेती सक्षम करा - जिल्हाधिकारी

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर,- बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेती, जलसंधारण, पीक विविधीकरण व आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करून कृषी क्षेत्र अधिक सक्षम करणे ही आजची गरज आहे. कृषी विभाग, कृषी विद्यापीठे व शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार शेतकऱ्यांनी शेतीचे नियोजन करून कमी पाण्यात अधिक उत्पादन देणाऱ्या पिकांना प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या सभागृहात माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कृषी दिन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा कृषी अधिकारी सुधीर शिंदे, आत्मा प्रकल्प संचालक प्रदीप लाटे, पशुसंवर्धन उपायुक्त उमेश पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी सर्वांना कृषी दिनाच्या शुभेच्छा देत सांगितले की, एल-निनोच्या



प्रभावामुळे यावर्षी राज्यात व जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस होण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तविली आहे. जुलै महिन्यातही पर्जन्यमान कमी राहण्याचा अंदाज असल्याने शेतकऱ्यांनी कृषी विभाग व कृषी विद्यापीठांच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे. आपल्या तालुक्यातील हवामान, मातीचा प्रकार आणि उपलब्ध पाण्याचा विचार करून कमी पाणी लागणाऱ्या पिकांची निवड करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, जिल्ह्यात रुंद वाफा - सरी पद्धतीचा वापर अपेक्षेपेक्षा कमी प्रमाणात होत आहे. मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये खरीप हंगामात या पद्धतीचा प्रभावी वापर होत असून, कमी पर्जन्यमानाच्या परिस्थितीतही पिकांचे नुकसान कमी करण्यासाठी ही पद्धत उपयुक्त ठरते. त्यामुळे कृषी विभागाने या तंत्रज्ञानाचा अधिकाधिक प्रसार करावा आणि शेतकऱ्यांनीही त्याचा अवलंब करावा.

एल-निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करून जिल्ह्यात वृक्षलागवड, मृद व जलसंधारण तसेच जलसंवर्धनाच्या कामांना गती देण्यात येत आहे. जिल्हा परिषद, ग्रामपंचायती तसेच विविध विभागांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड केली जात आहे. तसेच लघुपाटबंधारे, पाझर तलाव, के.टी. वेअर (कोल्हापूर प्रकार बंधारे) आणि इतर जलसंधारण संरचनांची दुरुस्ती तसेच पाणी साठवण क्षमता वाढविण्याची कामे हाती घेण्यात आली आहेत. जलयुक्त शिवार आणि गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार यांसारख्या शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून भूजल पुनर्भरणाला चालना देण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे.

पुढील काही महिने शेतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असून शेतकऱ्यांनी हंगामाचे नियोजन काळजीपूर्वक करावे. पीक विविधीकरण, फळबाग लागवड, अन्न प्रक्रिया उद्योग, दुग्ध व्यवसाय आणि इतर कृषीपूरक उद्योगांना चालना देऊन शेती अधिक फायदेशीर करण्यासाठी प्रशासनामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. मागील वर्षी जिल्ह्यात विक्रमी क्षेत्रावर फळबाग लागवड करण्यात आली असून, यावर्षीही त्यामध्ये वाढ करण्याचे उद्दिष्ट आहे.

# सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालयात महाराष्ट्र कृषी दिन साजरा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालय, अमृतनगर येथे १ जुलै महाराष्ट्र कृषी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी जवळे कडलग येथे शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमात प्रगतशील शेतकरी विष्णुपंत आनाजी रहाटळ, संजय मोहन देशमुख,ओमप्रकाश दिलीप देशमुखवश्री. राहुल कजबे उपस्थित होते. यावेळी विष्णुपंत रहाटळ यांनी विद्यार्थ्यांना स्व.वसंतराव नाईक यांच्या कृषी क्षेत्रातील योगदानाची माहिती देत शेतीशी नाळ कायम जोडून ठेवण्याचे, वेळेचे नियोजन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि वाचनाची सवय जोपासण्याचे महत्त्व सांगितले. संजय देशमुख यांनी आधुनिक शेतीतील संधी व पीक व्यवस्थापनाविषयी मार्गदर्शन केले.

शिवार फेरी दरम्यान विद्यार्थ्यांनी विष्णुपंत रहाटळ व ओमप्रकाश देशमुख यांच्या द्राक्ष बागांची पाहणी करून आधुनिक द्राक्षबाग व्यवस्थापन, छाटणी, पोषण व सिंचन तंत्रज्ञानाचा अभ्यास केला. यावेळी राहुल कजबे यांनी द्राक्ष बागेचे वैज्ञानिक व्यवस्थापन,कॅनोपी व्यवस्थापन, घडांची गुणवत्ता सुधारणा, रोग - कीड व्यवस्थापन, निर्यातक्षम द्राक्ष उत्पादन तसेच बाजार पेठाभिमुख शेती विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच विष्णुपंत रहाटळ यांच्या डाळिंब बागेतील आधुनिक व्यवस्थापन पद्धती आणि उन्हाळ्यातील उच्च तापमानाचा सामना करण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या टोमॅटो प्लॉटमधील प्रगत तंत्रज्ञानाची विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर. एस. वाघ यांनी स्व. वसंतराव नाईक यांच्या कृषी विकासातील योगदानाचा आढावा घेत विद्यार्थ्यांनी प्रगतशील शेतकऱ्यांच्या अनुभवातून ज्ञान आत्मसात करण्याचे आवाहन केले.

हा कार्यक्रम मा.कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली, विश्वस्त सौ.शरयूताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे तसेच प्रशासकीय अधिकारी प्रा.जी.बी.बाचकर यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. विशाल वाळे होते. या कार्यक्रमाचे नियोजन ग्रामीण कृषी कार्यानुभव (ठ-थए) कार्यक्रमांतर्गत जवळे कडलग येथे कार्यरत कृषिदूत कु.ओम औताडे, कु.श्रेयश देशमुख, कु.शिवराज बोऱ्हाडे, कु.पार्थ आहेर, कु.अनिकेत औताडे आणि कु.अजित बागडे यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.


SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
DADABHAI ALLIMAHAMMAD SAYYAD
NEW NAME AS
DADABHAI ALIMOHAMMAD SAYYAD
ADDRESS- SAHARA COLONY, KOLHEWADI ROAD
TAL- SANGAMNER 422605

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

**पाहिजेत**
मे. मोहनलाल बन्सीलाल दरडा
कॉम्प्युटर ऑपरेटर (१ जागा)
– पत्ता –
श्रद्धा फर्निचर शेजारी, अकोले रोड, संगमनेर
9822426782

**ड्रायव्हर पाहिजे**
ऑटोमॅटिक गाडीसाठी 01 जागा
मॅन्युअरल गेअर गाडीसाठी 01 जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
– संपर्क –
9117175050

**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी
अकाऊंटंट - 2 जागा
पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक
कामाचा अनुभव आवश्यक
८९९९८६२७५९

**SMFRI'S**
**Vamanrao Ithape B.Sc. Nursing College, Velhale, Sangamner**
At-Velhale, Post- Rajapur, Tal- Sangamner, Dist- Ahilyanagar.
Phone No-9370071777/ 8861555505 Email-ithapenursing@gmail.com
Website-www.smfri.org
**WALK-IN-INTERVIEW**
Applications Are Invites For The Post Of Principal, Vice Princiapl, Professor, Reader, Lecturer And Tutor As Per The Norms Of MUHS, Nashik

| Sr. No. | Designation | Subject | Vacant Post | SC | ST | VJ-NT | OBC | SEBC | EWS | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Professor Cum Vice Principal | Any Of The subject | 01 | - | - | - | - | - | - | 01 |

Note - Your Application Should Reach The Office Through E-mail Or In Person Before 07/07/2026
**Secretary** **President**

**पाहिजेत**
श्रद्धा एजन्सी
ड्रायव्हर - २ जागा
जे. पी. रोड, रंगारगल्ली संगमनेर, जि. अ.नगर
— संपर्क —
9665557877

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**भाड्याने देणे**
संगमनेर बस परिसरात, नासिक- पुणे हायवे लगत (तारा पान) च्या वर ऑफिस भाड्याने देणे आहे.
संपर्क
9922008706

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेल
वेल्डर - 2 जागा
हेल्पर - २ जागा
7030125701
7972963397







**भाड्याने देणे आहे**
संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर
- संपर्क -
9822258458

# खांडगाव ग्रामपंचायतीचे समाजहिताचे आदर्श निर्णय

## अनावश्यक खर्चाला फाटा, शिक्षण, आरोग्य आणि ग्रामविकासाला प्राधान्य



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर - संगमनेर तालुक्यातील खांडगाव ग्रामपंचायतीने सामाजिक सलोखा, आर्थिक बचत आणि गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा महत्त्वपूर्ण ठराव एकमताने मंजूर केले आहेत. ग्रामसभेत झालेल्या या निर्णयानुसार श्रद्धांजली कार्यक्रम, विवाह समारंभ आशीर्वाद, सत्कार समारंभ तसेच इतर समारंभांतील अनावश्यक खर्चिक प्रथा टाळून साधेपणाला प्रोत्साहन देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या ठरावानुसार श्रद्धांजली व विवाह समारंभानिमित्त स्वतंत्र कार्यक्रम आयोजित करणे शक्यतो टाळण्यात येणार असून, आवश्यक असल्यास केवळ दोन प्रतिनिधींमार्फत श्रद्धांजली अथवा विवाह सोहळ्यात आशीर्वाद व शुभेच्छा देण्याची पद्धत अवलंबण्यात येणार आहे. तसेच शाल, श्रीफळ, हार, पुष्पगुच्छ, मोठे बॅनर, फलक, सत्कार आणि अनावश्यक जेवणावळी यांसारख्या खर्चिक बाबींनाही फाटा देण्यात आला आहे.

या माध्यमातून होणारी आर्थिक बचत शिक्षण, शाळा, आरोग्य, वृक्षारोपण, जलसंवर्धन, ग्रामस्वच्छता आणि इतर समाजोपयोगी विकासकामांसाठी वापरण्यावर भर देण्यात आला आहे. हा निर्णय ग्रामस्थांच्या सर्वानुमते घेण्यात आल्याने गावात साधेपणा, सामाजिक ऐक्य आणि विकासाला नवी दिशा मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे. या उपक्रमामागे सरपंच ॲड. विकास गुंजाळ, ग्रामविकास अधिकारी श्रीम. उज्वला नवले, उपसरपंच सुनील रुपवते तसेच ग्रामपंचायतीच्या सर्व सदस्यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि कर्तव्यदक्ष कार्य विशेष उल्लेखनीय ठरत आहे. गावाचा सर्वांगीण विकास व्हावा, सामाजिक समता टिकून राहावी आणि अनावश्यक खर्चाला आळा बसावा या उदात्त हेतूने हे आदर्श ठराव मंजूर करण्यात आले आहेत.

खांडगाव ग्रामपंचायतीचा हा उपक्रम इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरणार असून, समाजहित आणि ग्रामविकासाचा आदर्श नमुना म्हणून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# अकोलेतील पाच गुन्हेगार तडीपार

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले -अकोले तालुक्यातील ५ सराईत गुन्हेगारांना अहिल्यानगर जिल्हा, तसेच शेजारील जिल्ह्यांच्या सीमांमधून ६ महिने तडीपार (हद्दपार) करण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. पोलीस उपाधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे यांच्यामार्फत संगमनेर उपविभागातील गुन्हेगारांविरुद्ध पाठविण्यात आलेल्या प्रस्तावावर प्रांताधिकारी अरुण उंडे यांनी हा निर्णय दिला.

संगमनेर उपविभागाचे पोलीस उपाधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे यांनी पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांना संबंधित पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगारांचे हद्दपारीचे प्रस्ताव तयार करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार तत्कालीन पोलीस निरीक्षक यांनी प्रस्ताव उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे सादर केले होते. त्यावर विद्यमान पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांनी पाठपुरावा केला. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि श्रीरामपूरचे अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागाचे पोलीस उपाधीक्षक डॉ. सोनवणे यांच्यामार्फत संगमनेर उपविभागातील गुन्हेगारांविरुद्ध पाठविण्यात आलेल्या प्रस्तावावर प्रांताधिकारी अरुण उंडे यांनी निर्णय दिला असून त्यांनी अकोले तालुक्यातील अकोले पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोतुळ येथील संकेत पांडुरंग खरात, सागर विजय खरात, अनिल निवृत्ती खरात आणि दत्तात्रय निवृत्ती खरात या चौघांना व धामणगावपाट येथील सराईत गुन्हेगार किसन वाळू चौधरी या ५ सराईत गुन्हेगारांचा गुन्हेगारी आलेख तपासून त्यांना अहिल्यानगर, पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुका आणि नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुका या भागात प्रवेश करण्यास पूर्णपणे मनाई करत ६ महिन्यासाठी तडीपार (हद्दपार) करण्याचे आदेश दिले आहे. या सर्वांवर महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये ही कठोर कारवाई करण्यात आली.

# संगमनेरात १२ जुलैस भारतीय प्रशासकीय सेवेच्या प्रशिक्षण गरुड अकॅडमीचे उद्‌घाटन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - स्पर्धा परीक्षांचे वाढते महत्त्व, राज्यातील मोठ्या प्रमाणावर होणारी शासकीय पदभरती आणि आगामी काळात अपेक्षित आठव्या वेतन आयोगाच्या पार्श्वभूमीवर संगमनेरमध्ये आधुनिक सुविधा असलेली 'गरुड भारतीय प्रशासकीय सेवा प्रशिक्षण अकॅडमी' उभारण्यात येणार असल्याची माहिती अकॅडमीच्या संचालिका सौ. किरण गणेश गागरे यांनी दिली.

यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह विविध शासकीय विभागांमार्फत आगामी काळात मोठ्या प्रमाणावर पदभरती होणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार मार्गदर्शन त्यांच्या परिसरातच उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही अकॅडमी सुरू करण्यात येत आहे. गट 'ड' पासून ते वर्ग-१ अधिकाऱ्यांच्या स्पर्धा परीक्षांपर्यंत सर्व अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहणार आहे.

संगमनेरचा शैक्षणिक क्षेत्रातील ठसा अधिक ठळक करण्यासाठी 'संगमनेर पॅटर्न' विकसित करण्याचा आमचा मानस असल्याचेही त्यांनी सांगितले. लातूर पॅटर्नप्रमाणेच स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी संगमनेरचीही स्वतंत्र ओळख निर्माण करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

पोलीस भरतीसह विविध स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असली तरी अनेक विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शनाच्या अभावामुळे यश मिळत नाही. अशा विद्यार्थ्यांना सक्षम प्रशिक्षण, सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि गुणवत्तापूर्ण अध्यापनाच्या माध्यमातून यशाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी 'गरुड' अकॅडमी कार्य करणार असल्याचे सौ. गागरे यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थी आणि पालकांसमोर प्रवेशसंख्या, निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण आणि प्रशिक्षणाचा दर्जा पूर्णपणे पारदर्शकपणे मांडला जाईल. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता असून योग्य दिशा आणि गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन मिळाल्यास ते निश्चितच राज्य व देशपातळीवरील स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# श्री मारुती देवस्थान माळी समाज पंच ट्रस्टच्या अध्यक्षपदी प्रसाद गोरे

## महिला उत्सव समितीच्या अध्यक्षपदी जयश्रीताई पुंड



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर शहरातील माळीवाडा याठिकाणी असलेले प्रसिद्ध व मानाच्या श्री मारुती देवस्थान माळी समाज पंच ट्रस्ट या देवस्थानची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दि. ३० जून २०२६ रोजी महात्मा फुले सभागृहात अत्यंत उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या सभेमध्ये आगामी २०२६-२०२७ या वर्षासाठी ट्रस्टच्या नवीन कार्यकारणीची बिनविरोध निवड करण्यात आली असून, अध्यक्षपदी प्रसाद ज्ञानदेव गोरे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

सदर सभेचे अध्यक्षपद श्री. अमित मंडलिक यांनी भूषविले. वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज अतिशय शिस्तबद्ध व सुसंवादी वातावरणात पार पडले. याप्रसंगी माळी समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, ज्येष्ठ नागरिक आणि तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माळी समाज पंच ट्रस्टची नवीन कार्यकारणी (२०२६-२०२७) मध्ये अध्यक्षपदी प्रसाद गोरे, उपाध्यक्षपदी योगेश मेहेर, सचिवपदी संतोष पावबाके, खजिनदारपदी किसन गलांडे यांची सर्व सभासदांच्या एकमताने व संमतीने बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. या वार्षिक सभेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, या सभेला 'सावित्रीच्या लेकी प्रतिष्ठान' च्या महिला सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. समाजाच्या व देवस्थानच्या विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांत महिलांचा सहभाग आणि नेतृत्व वाढावे या उद्देशाने, सभे दरम्यान उत्सव समितीच्या नवीन महिला पदाधिकाऱ्यांची देखील घोषणा करण्यात आली. महिला उत्सव समितीची नवीन कार्यकारणीमध्ये अध्यक्षपदी सौ. जयश्रीताई संजय पुंड, उपाध्यक्षपदी सौ. मिनलताई संतोष अभंग, सचिवपदी सौ. मालतीताई धनंजय डाके यांची निवड करण्यात आली आहे.

निवड प्रक्रियेनंतर सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे माळी समाजातील ज्येष्ठ-श्रेष्ठ आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन विशेष अभिनंदन करण्यात आले. यावेळी माजी अध्यक्ष अमित मंडलिक, उपाध्यक्ष भारत ढोले, सचिव अभिजित (मुन्ना) अरुणशेठ पुंड, खजिनदार अतुल अभंग यांच्या सह समाज बांधव उपस्थित होते.

समाजाच्या आणि देवस्थानच्या सर्वांगीण विकासासाठी, तसेच सामाजिक सलोखा आणि उपक्रम अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी ही नवीन कार्यकारणी कटिबद्ध राहील, असा विश्वास नवनियुक्त अध्यक्ष प्रसाद गोरे यांनी व्यक्त केला.

# वारकऱ्यांच्या 'चरण सेवेला' प्रारंभ




## मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची उपक्रम

आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरकडे पायी मार्गस्थ होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे 'चरण सेवा' उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध आरोग्य संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांच्या चरणसेवेला प्रारंभ झाला आहे. त्यात आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार आणि आरोग्य जनजागृतीच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

**चरण सेवेकरिता समन्वय** - वारकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'चरण सेवा' उपक्रमात सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर या ११ प्रमुख जिल्ह्यांचा समावेश आहे. पालखी मार्गावरील सुमारे ४०० विश्रांती व मुक्काम स्थळी वारकऱ्यांसाठी चरण सेवा, वैद्यकीय तपासणी, प्राथमिक उपचार तसेच आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या समन्वयातून १२ हजारांहून अधिक प्रशिक्षित डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय व फिजिओथेरपीचे विद्यार्थी तसेच स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी होऊन वारकऱ्यांच्या सेवेसाठी कार्यरत असतील.

**३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाद्वारे मालिश**- आषाढी वारीदरम्यान दररोज अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायांवर मोठा ताण येतो. पायांना सूज, वेदना, फोड, स्नायूंचा ताण व थकवा यांसारख्या समस्यांवर तात्काळ उपाययोजना उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी प्रशिक्षित वैद्यकीय पथके व स्वयंसेवक कार्यरत राहणार आहेत.

या उपक्रमांतर्गत औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयांकडे संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी सुमारे ३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाची व्यवस्था करण्यात आली असून, गरजेनुसार पालखी मार्गावर रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे.

**८ आरोग्य रथाद्वारे जनजागृती** -चरण सेवेसोबतच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळ्यातील आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैलीचा संदेश तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून पालखी मार्गावरील वारकरी आणि नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. तसेच, वारकऱ्यांच्या शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीसाठी पालखी मार्गावरील निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे.

गतवर्षी राबविण्यात आलेल्या 'चरण सेवा' उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. या उपक्रमाद्वारे सुमारे १ लाख ७५ हजार वारकऱ्यांना थेट चरण सेवा, वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या, तर १० लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यात आला होता. यंदाही अधिकाधिक वारकऱ्यांपर्यंत चरण सेवा, वैद्यकीय सुविधा आणि आरोग्य जनजागृती प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे.

**'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची'** -'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची' या संकल्पनेवर आधारित 'चरण सेवा' हा उपक्रम वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सेवेची जोड देणारा अभिनव उपक्रम आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकारातून जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामुळे वारकऱ्यांचा पायी प्रवास अधिक सुरक्षित, सुदृढ आणि सुखकर होण्यास मोठी मदत होणार आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने सर्व वारकरी, दिंडी प्रमुख तसेच पालखी मार्गावरील नागरिकांना 'चरणसेवा' आणि आरोग्य जनजागृती उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

**चरणसेवा म्हणजे काय?** - संत तुकाराम महाराजांनी तुज मागणें तें देवा, आम्हां तुझी चरण सेवा या अभंगातून चरण सेवेचे महत्व अधोरेखित केले आहे. त्याच सेवाभावातून प्रेरणा घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून 'चरण सेवा' उपक्रम गेल्या वर्षीपासून सुरू करण्यात आला आहे. यंदा या उपक्रमाचे दुसरे वर्ष आहे.

आषाढी वारीत अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायावर मोठा ताण येत असल्याने त्यांना औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, आधुनिक मसाज उपकरणांच्या साहाय्याने स्नायूंना आराम, सूज, वेदना व फोडांवर प्राथमिक उपचार तसेच आवश्यकतेनुसार वैद्यकीय तपासणी व पुढील उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली जाते.

वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देत सेवाभावातून आधार देणारी हीच 'चरणसेवा' होय. संत तुकाराम महाराजांच्या सेवाभावाच्या विचारांना आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देत वारकरी परंपरा आणि लोकसेवेचा सुंदर संगम या उपक्रमातून घडविण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील नेतृत्वातून आणि सेवाभावी दृष्टिकोनातून 'चरण सेवा' उपक्रम साकार झाला आहे. वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देणारा हा एक अभिनव उपक्रम असून, आषाढी वारीत लाखो वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देतानाच त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न या माध्यमातून होत आहे. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा मानत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष विविध संस्थांच्या समन्वयातून यंदाही ही चरण सेवा अधिक व्यापक स्वरूपात वारकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यास सज्ज असल्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

# सांगमनेरच्या शिरपेचात मानाचा तुरा

## व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूटचे ३ विद्यार्थी देशातील सर्वोच्च 'IIT' मध्ये!



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर येथील व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूटने यंदा पुन्हा एकदा शैक्षणिक गुणवत्तेचा नवा मानदंड प्रस्थापित केला आहे. संस्थेच्या तीन विद्यार्थ्यांनी देशातील अत्यंत प्रतिष्ठित भारतीय तंत्रज्ञान संस्थांमध्ये (IIT) प्रवेश मिळवून सांगमनेरच्या शैक्षणिक क्षेत्राला अभिमानाची नवी उंची मिळवून संगमनेरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

सायली कुलकर्णी, हिने आयआयटी बॉम्बे, मोहित सोलंके याने आयआयटी रुडकी, तर राशी बहेती हिने आयआयटी इंदोर येथे प्रवेश निश्चित केला आहे. भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT) या देशातील सर्वोच्च अभियांत्रिकी शिक्षणसंस्था मानल्या जातात. दरवर्षी लाखो विद्यार्थी जेईई ॲडव्हान्स परीक्षेद्वारे या संस्थांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी प्रयत्न करतात; मात्र अत्यंत मर्यादित जागांमुळे केवळ सर्वोत्तम विद्यार्थीच या स्पर्धेत यशस्वी ठरतात. त्यामुळे आयआयटीमध्ये प्रवेश मिळवणे हे केवळ शैक्षणिक यश नसून कठोर परिश्रम, सातत्य, चिकाटी आणि उत्कृष्टतेचे प्रतीक मानले जाते.

आयआयटी संस्थांमध्ये जागतिक दर्जाचे शिक्षण, अत्याधुनिक संशोधन सुविधा, नाविन्यपूर्ण विचारसरणी आणि उद्योगविश्वाशी मजबूत संबंध यांचा अनोखा संगम पाहायला मिळतो. देश-विदेशातील अनेक नामवंत शास्त्रज्ञ, उद्योजक, संशोधक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील नेते हे आयआयटीचे माजी विद्यार्थी आहेत.

कु. सायली, चिं. मोहित आणि कु.राशी यांच्या यशामागे त्यांची मेहनत आणि समर्पण जितके महत्त्वाचे आहे, तितकीच मोलाची भूमिका व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूटने बजावली आहे. नियोजनबद्ध अध्यापन, नियमित चाचण्या, वैयक्तिक मार्गदर्शन, शंका निरसन सत्रे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर दिलेला भर यामुळे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी सक्षम व्यासपीठ मिळाले.

याप्रसंगी व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूटचे मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. हर्षवर्धन गुंजाळ म्हणाले, विद्यार्थ्यांच्या यशामागे सातत्य, शिस्त आणि स्वतःवरील विश्वास अत्यंत महत्त्वाचा असतो. व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूटमध्ये आम्ही केवळ परीक्षेची तयारी करून घेत नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये समस्या सोडवण्याची क्षमता, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित करण्यावर भर देतो. सायली, मोहित आणि राशी यांचे यश हे योग्य मार्गदर्शन आणि कठोर परिश्रम यांच्या सुंदर संगमाचे उदाहरण आहे.

व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूटने गेल्या काही वर्षांत जेईई, नीट आणि फाउंडेशन अभ्यासक्रमांसाठी प्रभावी शैक्षणिक वातावरण निर्माण केले आहे. संस्थेच्या अनुभवी शिक्षकवर्गाने आणि विद्यार्थीकेंद्रित अध्यापन पद्धतीने अनेक विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वप्नांच्या दिशेने यशस्वी वाटचाल करण्यास प्रेरित केले आहे. आयआयटी बॉम्बे, आयआयटी रुडकी आणि आयआयटी इंदोर मध्ये प्रवेश मिळवणाऱ्या या तिन्ही विद्यार्थ्यांनी केवळ स्वतःचेच नव्हे, तर आपल्या कुटुंबाचे, शिक्षकांचे आणि संपूर्ण सांगमनेरचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांचे हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असून, योग्य दिशा, गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर कोणतेही स्वप्न साकार करता येते, हा संदेश ते सर्वांना देत आहेत.

ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५० संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



भंडारी
विवाह
“शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी”
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिझायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# महाराष्ट्राची 'चेरापुंजी' कोरडीच

## भंडारदरा परिसरात गतवर्षीपेक्षा तब्बल ९३० मिमी पाऊस कमी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्राची 'चेरापुंजी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अकोले तालुक्यातील भंडारदरा-घाटघर परिसरात यंदा पावसाने निराशा केली आहे. १ जून ते १ जुलै २०२६ या कालावधीत घाटघर येथे केवळ ३७० मिमी पावसाची नोंद झाली असून, गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील १,१५९ मिमी पावसाच्या तुलनेत तब्बल ९३० मिमीने घट झाली आहे. त्यामुळे आदिवासी भागात पाणीटंचाईची चिंता वाढली असून, खरीप हंगामावरही अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले आहे.



घाटघर परिसरात दरवर्षी जून महिन्यात सरासरी १,१०० ते १,३०० मिमी पाऊस पडतो. मात्र यंदा पावसाने पाठ फिरवल्याने भात पिकांची रोपे मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. दरम्यान, राज्यातील धरणांमधील पाणीसाठाही चिंताजनक पातळीवर घसरला आहे. १ जुलै २०२६ रोजी राज्यातील ३,०२८ लहान-मोठ्या धरणांमध्ये केवळ २३.८९ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असून, गेल्या वर्षी याच दिवशी तो ४५.७६ टक्के होता. म्हणजेच यंदा २१.८७ टक्क्यांनी पाणीसाठा कमी आहे. अल-निनोचा प्रभाव आणि वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनाचे प्रमाण वाढल्याने ही परिस्थिती निर्माण झाल्याचे जलसंपदा विभागाचे निवृत्त अभियंता व जलतज्ज्ञ इंजि. हरिश्चंद्र चकोर यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना पेरणीत घाई न करण्याचा सल्ला- ग्रामीण भागात पाणीटंचाई तीव्र होत असल्याने प्रशासनाने ३१ ऑगस्टपर्यंत पिण्याच्या पाण्याचे नियोजन सुरू केले असून, अनेक ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर जलतज्ज्ञ इंजि. हरिश्चंद्र चकोर यांनी शेतकऱ्यांना पेरणीची घाई न करण्याचे आवाहन केले आहे. धरण क्षेत्रात समाधानकारक पाऊस होऊन जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाल्यानंतरच पेरणी करावी. अन्यथा दुबार पेरणीची वेळ येऊन बियाणे, खते व मजुरीवरील खर्च वाया जाऊ शकतो. हवामान खात्याचा अंदाज आणि स्थानिक पावसाची स्थिती लक्षात घेऊनच नियोजन करावे, असा सल्ला त्यांनी दिला.

पर्यटनावरही परिणाम- पावसाच्या लपंडावामुळे भंडारदरा आणि सह्याद्री घाटमाथ्यावरील निसर्गसौंदर्य अद्याप खुललेले नाही. प्रसिद्ध धबधबे कोरडेच असून, डोंगररांगांवर नेहमीप्रमाणे हिरवळ आणि धुक्याची चादरही दिसून येत नाही. त्यामुळे पावसाळी पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांमध्ये निराशेचे वातावरण आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रमुख धरणांतील उपयुक्त पाणीसाठा - अहिल्यानगर जिल्ह्यातील १३ प्रकल्पांमध्ये मिळून सध्या केवळ १३.३० टीएमसी पाणी शिल्लक असून, गतवर्षीच्या तुलनेत सुमारे २० टीएमसीने घट झाली आहे. मुळा धरण - २४.७९%,आढळा धरण - ३४.०६%, सीना धरण - ३१.४६%, भंडारदरा धरण - २२.८५%, निळवंडे धरण - १८.६५%, खैरी धरण - १७.१६%, घोड धरण - १५.७१%,मांडोहोळ धरण - ६.२१%. यंदाच्या मान्सूनच्या संथ सुरुवातीमुळे शेती, पिण्याचे पाणी आणि पर्यटन या तिन्ही क्षेत्रांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले असून, आता सर्वांचे लक्ष जुलै महिन्यात होणाऱ्या पावसाकडे लागले आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक वारशाचे प्रतीक ठरणार असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. या निर्णयाबद्दल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख अमर कतारी यांनी समाधान व्यक्त करत नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे, आमदार सत्यजित तांबे, आमदार अमोल खताळ, माजी मंत्री बाळासाहेब थोरात तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले.

शहरप्रमुख अमित चव्हाण, फैसल सय्यद, पप्पू कानकाटे, तालुकाप्रमुख भीमाशंकर पावसे, युवासेना जिल्हाप्रमुख अक्षय गुंजाळ, अमोल डुकरे, शिवजयंती उत्सव युवक समितीचे पदाधिकारी, सदस्य आणि शिवभक्तांनी या निर्णयाचे स्वागत करत आनंद व्यक्त केला. आवश्यक असल्यास ही बातमी आणखी वृत्तपत्रीय शैलीत, अधिक धारदार मथळ्यासह किंवा ब्रेकिंग न्यूज स्वरूपातही तयार करून देऊ शकतो.

# राम मंदिर देणगी प्रकरणात ट्रस्टमध्येच आरोप-प्रत्यारोप

आयोध्या (वृत्तसंस्था)

अयोध्या राम मंदिर देणगी चोरी प्रकरणात आता ट्रस्टच्या सदस्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. पहिल्यांदाच राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे विश्वस्त महंत दिनेंद्र दास महाराज यांनी माजी पदाधिकारी गोपाल राव यांच्यावर आरोप केले. ते म्हणाले- पूर्ण चूक गोपाल राव यांची आहे. ते राजकारण करत आहेत. ते सगळ्यांना गोंधळात टाकतात. ते रामाची परंपरा मानत नाहीत. गोपाल राव राम मंदिराचे बांधकाम प्रभारी आणि ट्रस्टचे आमंत्रित सदस्य होते. मूळचे ते कर्नाटकचे रहिवासी आहेत.

दरम्यान, अयोध्या बार असोसिएशनच्या वकिलांनी चंपत राय, अनिल मिश्रा आणि गोपाल राव यांच्यावर एफआयआर दाखल करण्यासाठी पोलिसांत तक्रार दिली. बार असोसिएशनचे अध्यक्ष कालिका प्रसाद मिश्र म्हणाले- आमच्या तक्रारीत चार लोकांची नावे आहेत. पोलिसांचे म्हणणे आहे की एफआयआर दाखल केला जाईल. सूत्रांनुसार, देणगी चोरीच्या आरोपींविरोधात सरकार कठोर कारवाई करणार आहे. प्रशासनाने आरोपींच्या नवीन घरांवर बुलडोझर चालवण्याची तयारी सुरु केली आहे. अयोध्या विकास प्राधिकरणाने अशा घरांची ओळख पटवली आहे, ज्यांचा नकाशा मंजूर नाही किंवा ज्यांनी नियमांचे उल्लंघन केले आहे. त्या आरोपींची घरे रडारवर आहेत, जी त्यांनी मंदिरात नोकरी मिळाल्यानंतर बांधली. आरोपी लवकुश मिश्राचे शहादतगंजमध्ये बांधकाम सुरू असलेले घर आणि अनुकल्प मिश्राचे कौशल पुरी येथील घरावर बुलडोझर फिरवला जाऊ शकतो. पोलिसांनी ३० जून रोजी अयोध्या कारागृहात आरोपी अविनाश शुक्लाची चौकशी केली होती, आता पुढील तपास करत आहेत. ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांची रविवारी ३ तास चौकशी झाली आहे. आता त्याची पडताळणी करण्यासाठी अनिल मिश्रा यांची आज चौकशी होऊ शकते. आरोपी लवकुश मिश्रा आणि अनुकल्प मिश्रा यांच्या नियुक्तीतील त्यांच्या भूमिकेची चौकशी केली जाईल.

# मध्यान्ह भोजन योजनेतील कर्मचाऱ्यांना ७ हजार रुपये मानधन द्या - आ. खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यातील जिल्हा परिषद, नगर परिषद, महानगरपालिका तसेच अनुदानित शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री शक्ती पोषण आहार (मध्यान्ह भोजन) योजनेतील कर्मचाऱ्यांना हरियाणा राज्याच्या धर्तीवरती दरमहा ७ हजार रुपये मानधन देण्यात यावे, अशी जोरदार मागणी आमदार अमोल खताळ यांनी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात या महत्त्वाच्या प्रश्नाकडे त्यांनी राज्य सरकारचे लक्ष वेधत तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली



राज्यभरात जिल्हा परिषद, नगर परिषद, महानगरपालिका आणि अनुदानित शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री शक्ती पोषण आहार (मध्यान्ह भोजन) योजनेत सुमारे तीन लाख कर्मचारी कार्यरत आहेत. अत्यल्प मानधनावर हे कर्मचारी लाखो विद्यार्थ्यांना दररोज आहार उपलब्ध करून देण्याचे काम करत आहेत.विद्यार्थ्यांच्या भविष्या साठी त्यांचे योगदान मोलाचे असूनही त्यांना अत्यंत कमी मानधनावर काम करावे लागत असल्याची खंत आ. खताळ यांनी विधिमंडळात व्यक्त करत , ५ जुलै २०२४ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या कर्मचाऱ्यांच्या मानधनात एक हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.मात्र यानिर्णयाची अद्याप प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी
अंतर्गत अर्थसहाय्य देण्यात येणारे आजार
● हृदयरोग (Heart Diseases)
● मेंदूरोग (Brain Diseases)
● कर्करोग शस्त्रक्रिया
● अपघात (Accident)
● लहान बालकांची शस्त्रक्रिया
● गुडघ्याचे प्रत्यारोपण
● विद्युत अपघात रुग्ण
● कर्करोग (केमोथेरपी रेडिएशन)
● डायलिसिस
● अपघात शस्त्रक्रिया
● खुबा प्रत्यारोपण
● मेंदूत रक्तस्त्राव होणे / मेंदूत रक्त गोठणे.
२४ तास सुविधांसाठी
०२४२५ - २२४७६२
मोबा. ७०३८२७०३८२
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
♦ मासिक पाळीच्या तक्रारी ♦ योनी मार्गाची दुर्गंधी
♦ अंगावरून पांढरे जाणे ♦ गुप्त अंगाला खाज
♦ गर्भ न रहाणे ♦ विविध त्वचा विकार
♦ वारंवार गर्भपात होणे ♦ गुप्तरोग, गर्मी
♦ गर्भाशयात गाठी ♦ लघवीला जळजळ
♦ गर्भाशयाचा कर्करोग ♦ संभोगात रस न येणे
♦ स्तनांची वाढ न होणे ♦ संभोगा विषयीची भीती
♦ स्तनातून दूध न येणे ♦ हस्तमैथूनाची सवय
♦ स्तनात गाठी ♦ लैंगिक विकृती
♦ स्तनाचा कर्करोग ♦ मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25